# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/आढावा बैठक/२०२०// 178
दिनांक : 10 JAN 2020

कालमर्यादा :
दि. ११.०१.२०२०, दुपारी ०३.०० वाजेपर्यंत

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने,
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये.

**विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या सर्व विभागीय सहसंचालकांच्या बैठकीच्या अनुषंगाने माहिती सादर करण्याबाबत...**

संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र : १०/एनजीपी/आढावा बैठक/२०२०/२२, दि. ०९.०१.२०२०

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे. तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व विभागीय सहसंचालकांची आढावा बैठक मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०४.२०१९, १७.१०.२०१९ व शासकीय तंत्रनिकेनांच्या प्राचार्यांची बैठक दिनांक १३.१२.२०१८ रोजी, आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकांच्या इतिवृत्तांच्या प्रती या पत्रासोबत जोडल्या आहेत.

या इतिवृत्तातीत विविध मुद्यांच्या अनुषंगाने, आपल्या संस्थेशी संबंधित मुद्यांबाबत करण्यात आलेली कार्यवाही व आज रोजीच्या सद्यस्थितीची सुधारीत माहिती या कार्यालयास दिनांक ११.०१.२०२० रोजी. दुपारी ०३.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावी.

याकरीता उद्या शनिवार दिनांक ११.०१.२०२० या सुट्टीच्या दिवशी या विषयाशी संबंधित असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कामावर उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावर सूचित करण्यात यावे.

सोबत : एकूण ०३ इतिवृत्तांच्या छायाप्रती.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२

E-mail :- desk1@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in

## तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व विभागीय सहसंचालकांच्या दि. २/४/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व विभागीय सहसंचालकांची आढावा बैठक श्री. सौरभ विजय, मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि. २/४/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. सिडनेहॅम इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई येथे आयोजित केली होती.

सदर बैठकीस सोबतच्या यादीत नमुद अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम डॉ. अभय वाघ, संचालक यांनी दि.१५ व १६ फेब्रुवारी रोजी पुणे येथे पार पडलेल्या TEQIP-III च्या National Conference बाबतचा संचालनालयाकडून तयार केलेला अहवाल मा.सचिवांना हस्तांतरीत केला. तदनंतर संचालक यांनी सर्वप्रथम मागील आढावा बैठकीच्या अनुषंगाने मा.सचिव यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार संचालनालयाकडून करण्यात आलेल्या विविध कामाबाबत मा. सचिव यांना अवगत केले. तसेच सर्व विभागीय सहसंचालकांनी मागील बैठकीनंतर ज्या कार्यवाही केल्या आहेत त्याचे Presentation सादर करणेबाबत सूचित केले. त्यानुसार सर्व विभागीय सहसंचालकांनी व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या विभागाचे बैठकीच्या कार्यसूचीनुसार Power Point Presentation सादर केले. सदर Presentation सादर होत असतानाच मा.सचिव व संचालक यांनी विभागीय कार्यालयाकडून तंत्रशिक्षणाशी निगडीत त्यांना अपेक्षित असलेल्या कामकाजाबाबत पुढीलप्रमाणे सूचना दिल्यात :-

१. तंत्रशिक्षण संचालनालयाने आता गुणवत्ता सुधार हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवलेले असल्यामुळे सर्वांनी त्यादृष्टीने काम करणे अपेक्षित आहे. मा.सचिवांनी यापूर्वी दिलेल्या सुचनांनुसार सर्व विभागीय कार्यालयांकडून मासिक अहवाल संचालनालयास मिळालेला नाही. तरी यापुढे सर्व विभागाकडून गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत संचालनालयास वेळोवेळी अवगत करण्यात यावे.

२. डीबीटी बाबतचे सर्व विभागीय कार्यालयांचे काम उत्तम झालेले आहे. Team Work मुळे हे काम यशस्वी झालेले आहे. त्यामुळे यापुढेही अशाच पध्दतीने Team Work झाले पाहिजे.

३. संस्थांच्या/अभ्यासक्रमांच्या NBA बाबतची स्थिती फारशी समाधानकारक नाही. त्यावर सर्वच वि... सहसंचालकांनी भर देऊन गुणवत्ता सुधारणेसाठी कठोर परीश्रम घेणे गरजेचे आहे. त्याकरीता सहसंचालकांचे राज्यस्तरावरील आढावा बैठकीमध्ये ज्या सूचना दिल्या जातात त्या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्थेत प्राचार्य, विभाग प्रमुख यांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सर्व सहसंचालकांनी कार्यवाही करावी व संस्थेतील जास्तीत जास्त अभ्यासक्रमांना NBA चे मानांकन मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे अशासकीय अनुदानीत संस्थांना देखील NBA चे मानांकनासाठी प्रवृत्त करावे, जेणेकरुन महाराष्ट्राच्या तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावल्या जाईल.

४. शासकीय संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता मिळविण्याच्या दृष्टीने अद्यापही यथोचित प्रयत्न होत नसल्याचे दिसून येते. शैक्षणिक स्वायत्ततेमुळे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम संस्थेमध्ये राबविले जाऊ शकतात. पारंपारिक अभ्यासक्रमांसोबतच आधुनिक तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना मिळण्याच्या दृष्टीने नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम राबविण्याकरीता शैक्षणिक स्वायत्तता असणे अत्यंत आवश्यक आहे.

५. NBA चे मानांकन हे साधारणत: तीन वर्षाकरीता दिले जाते. ज्या संस्थांना NBA चे मानांकन प्राप्त झालेले आहे त्याची Validity तपासून पुढील मानांकन प्राप्त करण्याच्या दृष्टीने माहिती तयार करुन संचालनालयास सादर करावी. सर्व विभागीय सहसंचालकांनी सध्या प्राप्त असलेल्या NBA चे मानांकनाबाबत एक सविस्तर तक्ता तयार करुन त्यामध्ये सर्व माहिती भरुन संचालनालयास सादर करावी. NBA चे मानांकन प्राप्त करुन घेण्यात येत असलेल्या अडचणी देखील दर्शविण्यात याव्यात.

६. उद्योगधंद्यांसोबत केलेल्या MOU बाबत जी माहिती विभागीय सहसंचालकांनी सादर केली त्यातील बरेचसे MOU हे मागील ५-६ वर्षातील होते. मात्र आता अलिकडच्या काळात नवीन उद्योगधंद्यांसोबत फारच कमी MOU केलेले आहेत. तरी सर्व शासकीय संस्थांमधील प्राचार्य/विभाग प्रमुख यांना विभागीय सहसंचालकांनी नवीन नवीन उद्योगधंद्यांसोबत MOU करणेकरीता प्रवृत्त करावे व जास्तीत जास्त MOU होण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करणे आवश्यक आहे त्याचा आढावा घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे पुढील Presentation तयार करताना त्यामध्ये MOU बाबतची मोघम माहिती न देता सविस्तर Statistics दर्शवून माहिती तयार करावी. सदर माहिती तयार करताना ती अभ्यासक्रमनिहाय करण्यात यावी, तसेच प्रत्येक MOU कधी केला, कधी समाप्त होणार आहे, तो कधी Renew करावयाचा आहे याचा देखील उल्लेख असणे आवश्यक आहे.

७. सर्व विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांच्या प्राचार्यांची नियमीतपणे बैठक घेऊन तंत्रानिकेतनांमध्ये नवीन आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत प्रगती करण्याकरीता काय काय उपययोजना केल्या जातील याचा उहापोह करुन त्यानुसार अमंलबजावणी करावी.

८. Teaching Learning Process बाबत सद्यस्थितीत परिस्थिती समाधानकारक आहे. मात्र Training Programs करीता कांही निधी कमी पडत असेल तर तसे संचालनालयास कळवावे, जेणेकरुन त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करुन त्याबाबतची तरतूद करुन घेता येईल. संचालनालयामार्फत Teachers Training करीता IIT सारख्या ख्यातनाम संस्थेत एखादी कार्यशाळा आयोजित करावी, जेणेकरुन त्याचा शिक्षकांना फायदा होऊ शकतो.

९. सर्व सहसंचालकांनी Transition Rate वर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. प्रथम वर्षातील विद्यार्थी उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात जाताना तो त्या वर्षाचा अभ्यासक्रम योग्य रित्या पूर्ण करु शकेल की नाही, याचा सर्व प्राचार्यांनी आढावा घेणे गरजेचे आहे, अभ्यासात कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळून, त्यांच्या अडचणींचे निराकरण होऊन निकालाची टक्केवारी ही उत्तम राहील.

१०. सर्व विभागीय सहसंचालकांनी Academic Calender सारखे गुणवत्ता सुधार व तंत्रशिक्षणचा दर्जा वाढविण्याकरीता करावयाच्या उपाययोजनांसाठी एक वार्षिक Calender तयार करावे व त्यानुसार कार्यक्रमांचे आयोजन करुन अंमलबजावणी करावी.

११. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी तयार केलेल्या Prespective Plan Presentation च्या आधारे ज्या मुद्दयांवर कार्यवाही करावयाची आहे त्याबाबत विभागीय सहसंचालकांनी सर्व प्राचार्यांची बैठक आयोजित करुन संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे Presentation संबंधीतांच्या निर्दशनास आणुन याबाबत अवगत करावे व काय कार्यवाही करता येईल याचा आढावा घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. सन २०१९-२० करीता जे Targets ठरवून दिलेली आहेत ती पूर्ण करण्याकरीता यथोचित प्रयत्न करुन Targets पूर्ण केली जातील असे पहावे.

१२. शासनाकडून देण्यात येणा-या शिष्यवृत्त्या जसे राजर्षि शाहू शिष्यवृत्ती, पंजाबराव देशमुख शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती यासारख्या योजनांची माहिती प्रत्येक विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या विभागीय कार्यालयाच्या संकेत स्थळावर दर्शनी दिसेल अशा पध्दतीने प्रसिध्द करावी, तसेच सर्व शासकीय संस्थांमध्ये दर्शनी भागात याबाबतच्या माहितीचे सूचना फलक लावावेत. जेणेकरुन सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत याची माहिती पोहोचली जाईल व जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनांचा लाभ घेऊ शकतील.

१३. सर्व संस्थांनी माजी विद्यार्थ्यांचे मेळावे वारंवार आयोजित करुन संस्थेच्या विकासासाठी त्यांचेकडून कांही मदत घेता येईल त्यादृष्टीने प्रयत्न करावेत. प्रत्येक विभागाने आपआपल्या विभागात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करावे.

१४. जळगाव, नंदूरबार, धुळे यासारख्या अविकसित जिल्हयांकडे जास्त बारकाईने लक्ष देऊन तेथील तंत्रनिकेतनांची गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विकसित जिल्हयातील तंत्रनिकेतनांपेक्षा अशा अविकसित जिल्हयांतील तंत्रनिकेतनांचा विकास कसा करता येईल याबाबतच्या उपाययोजना सर्व विभागीय सहसंचालकांनी तयार कराव्यात. या प्रक्रीयेमध्ये त्या त्या तंत्रनिकेतनांचे प्राचार्य, विभाग प्रमुख यांना सहभागी करुन घेऊन त्यांच्याशी निरंतर संवाद ठेवून, त्यांना योग्य ते मार्गदर्शन देऊन सदर तंत्रनिकेतने मुख्य प्रवाहात कशी येतील याद्दष्टीने प्रयत्न करावेत. तंत्रशिक्षण संचालनालयाने देखील याकरीता एक तज्ज्ञ अधिका-यांची टिम तयार करावी व त्यांनी कांही महत्वाच्या तंत्रनिकेतनांमध्ये जाऊन तेथील कांही चांगल्या Systemsचा आढावा घेऊन त्या Systems अशा अविकसीत तंत्रनिकेतनांमध्ये राबविण्याच्या द्दष्टीने संस्थांना मार्गदर्शन करावे.

१५. सर्व विभागीय कार्यालये आणि संस्थांची संकेतस्थळे अद्ययावत असून सर्व संस्थांमध्ये Public Grievance System सुरु करण्यात आलेली असून विद्यार्थी-पालकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात येत आहे ही समाधानाची बाब असून अशाच पध्दतीने यापुढेही कार्यवाही करण्यात यावी.

१६. न्यायालयीन प्रकरणाबाबतही अवमान याचिका दाखल होणार नाहीत याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. तसेच जी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत त्याबाबतची कार्यवाही जसे प्रतिज्ञापत्र दाखल करणे, शासन स्तरावरून मार्गदर्शन घेणे याबाबतची कार्यवाही विहित कालमर्यादेत करण्यात यावी. तसेच न्यायालयीन प्रकरणांबाबतची सद्यस्थितीची माहिती वेळच्या वेळी संचालनालयाच्या निदर्शनास आणण्यात यावी.

१७. विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानीत संस्थांना देखील NBA मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी प्रवृत्त करावे व जास्तीत जास्त संस्था NBA अथवा NAAC चे मानांकन प्राप्त करुन घेतील असे पहावे.

१८. यापुढे सर्व विभागीय कार्यालयांच्या Presentation मध्ये एकसूत्रता व समानता येईल अशा पध्दतीने तंत्रशिक्षण संचालनालयाने Presentationचा Format तयार करावा, जेणेकरुन सर्वांचे Presentation मध्ये समानता यईल.

तद्नंतर श्री.नाईक, सहसंचालक यांनी मा.सचिवांनी आपल्या व्यस्त दिनक्रमामधून वेळ काढून सदर आढावा बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आणि मार्गदर्शन केल्याबद्दल संचालनालयाच्या वतीने तसेच सर्व विभागीय सहसंचालकांच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त केले, तसेच सर्व उपस्थित विभागीय सहसंचालकांचे आभार मानून सहसंचालकांची आढावा बैठक समाप्त झाली असे जाहीर केले.

*********************

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१

E-mail : desk1@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in


## तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालयांचे सहसंचालक यांच्या दि. १७/१०/२०१९ रोजी तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे आयोजीत आढावा बैठकीचे इतिवृत्त

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सहसंचालक, विभागीय कार्यालय यांची मा.सचिव, सौरभ विजय , उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. १७.१०.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे समिती सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अधिका-यांनासुध्दा निमंत्रित करण्यात आले होते.

सदर बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे.

१. सर्वप्रथम मा. सचिव यांच्या हस्ते तंत्रशिक्षण संचालनालयातील नुकत्याच नुतनिकरण करण्यात आलेल्या समिती सभागृहाचे उदघाटन करण्यात आले. डॉ. अभय वाघ, संचालक यांनी बैठकीचे सुरुवातीस मा.सचिव व मा. उपसचिव यांचे स्वागत करुन मागील ३ वर्षामध्ये शासकीय तंत्रनिकेतनातील प्रवेशाच्या झपाटयाने कमी झालेल्या संख्येच्या तुलनेत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मागील शैक्षणिक वर्षापेक्षा साधारणत: १०% प्रवेशाची संख्या वाढली आहे त्याबद्दल सर्व सहसंचालकांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे वाढलेली विद्यार्थ्यांची संख्या टिकवून व यानंतर कशी वाढत राहील याची दक्षता प्राचार्य आणि सहसंचालकांनी घेण्याचे सुचित केले. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त करताना फक्त प्रवेश प्रक्रियेपुरतेच आपले कार्यक्षेत्र मर्यादित न ठेवता प्रवेशित विद्यार्थ्यांचा सर्वागिण विकास साधून त्यांना रोजगारक्षम करण्याबाबत आवश्यक ते सर्व प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रवेशित विद्यार्थांची गुणवत्ता, कौटुंबिक पार्श्वभूमी, आर्थिक क्षमता या बाबींचा विचार करुन विद्यार्थ्यांना कोणत्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देता येतील याबाबत विचार करणेबाबत सहसंचालकांना सुचित केले.

२. श्री. गौरव व श्रीमती सितागिरी (Consultant E.Y.Global Ltd.) यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश व त्यांची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशा सोबत तुलना, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता विविध शासकीय तंत्रनिकेतनांच्या प्रवेशाबाबतच्या स्थितीची सुधारणा तसेच बेस लाईन टेस्टचे निकाल व त्या अनुषगांने

रिमेडियल क्लासेस व त्यांची अमलबजावणी इत्यादी बाबीवर प्रकाश टाकणाऱ्या माहितीचे Power Poin सादरीकरण केले.

३. सदर सादरीकरण सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना व मंडळाच्या विभागीय कार्यालयांच्या उप असलेल्या उपसचिव यांना उपलब्ध करुन देण्यात यावे, तसेच त्या अनुषंगाने विभागीय कार्यालयां महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी त्यांच्या विभागातील प्राचार्यांची बैठक घेऊन रिमेडियल क्लासेस बा काटेकोरपणे अंमलबजावणी करावी अशा सुचना करण्यात आल्या. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच विभागीय कार्यालयांनी याबाबत सर्व शासकीय तंत्रनिकेतना सोबत समन्वय साधून रिमेडियल क्लासेसबाबत अंमलबजावणी होत असल्याबाबत खात्री करावी. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने त्यांचे Career Fai चे माध्यमातून School Connect बाबत योग्य ती कार्यवाही तात्काळ सुरु करण्याचे सूचित करण्यात आले.

४. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने रिमेडियल क्लासेस बाबत ऑनलाईन फिडबॅक फॉर्मची रचना करुन या संकल्पनेच्या उपयुक्तता व अंतिम परिणाम याचे मुल्यमापन करण्याबातची कार्यवाही करणेबाबत मा. सचिव व संचालक यांनी सुचना केल्या .

५. शासकीय संस्थांच्या एनबीए बाबतच्या विभागनिहाय सद्यस्थितीबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांनी मा. सचिव यांचेपुढे सादरीकरण केले.

अ) पदवी अभ्यासक्रमांच्या ०४ संस्थामधील २० अभ्यासक्रम व पदविका अभ्यासक्रमाच्या ०४ संस्थामधील १९ अभ्यासक्रम यांना एनबीए मानांकन प्राप्त असल्याबाबत माहिती दिली. तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या ०२ संस्थामधील ०८ अभ्यासक्रमांसाठी व पदवी अभ्यासक्रमाच्या ०१ संस्थेमधील ०२ अभ्यासक्रमासांठी SAR अपलोड करण्यात आले आहे. विभागवार विविध संस्थांच्या अभ्यासक्रमांच्या एनबीएच्या SAR अपलोड करण्याचा संभावित दिनांक दर्शविणारी माहिती सुध्दा मा.सचिव यांना सादर करण्यात आली.

ब) पदविका अभ्यासक्रमांच्या ३३ संस्थामधील ९७ अभ्यासक्रमांसाठी SFR ची अट पूर्ण करण्यासाठी प्रत्येक संस्थेस आवश्यक असलेल्या शिक्षकांच्या इतर संस्थामधून ( जेथे अतिरिक्त उपलब्ध असतील ) सेवा उपलब्ध करुन दिल्यास या एकूण ९७ अभ्यासक्रमांना एनबीए करिता SAR अपलोड करता येणे शक्य आहे याबाबत अवगत केले. व याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला असल्याचे संचालकांनी नमुद केले.

६. सर्व विभागांच्या सहसंचालकांनी त्यांच्या विभागा अतंर्गत अतिरिक्त असलेल्या शिक्षकांच्या सेवा त्यांचे विभागातील इतर संस्थेत एनबीएचे शैक्षणिक कार्यभारासाठी आवश्यक असल्यास तात्पूरत्या स्वरुपात त्यांच्या स्तरावर उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे मा. सचिव यांचेकडून सूचित करण्यात आले.

७. मा. सचिवांनी तंत्रनिकेतनातील अभ्यासक्रमांच्या एनबीएच्या सद्यस्थिती बाबत नाराजी व्यक्त केली. शासन या बाबत गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांची पुढील कारकिर्द तसेच पदोन्नती बाबत विचार करेल असे मत व्यक्त केले. संचालकांनी सादर केलेल्या ९७ अभ्यासक्रमांपैकी जास्तीत जास्त अभ्यासक्रमांना एनबीए SAR अपलोड करण्याबाबतची कार्यवाही संबंधीत सहसंचालकांनी पुढाकार घेऊन पुढील ०३ महिन्यात करण्यात यावी असे सुचित केले. एनबीए करिता आवश्यक असलेली शैक्षणिक माहिती महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ संस्थांना उपलब्ध करुन देतील. संस्थेकडून एनबीएबाबत अपेक्षित कार्यवाही न झाल्यास संबंधित विभागप्रमुख व संबंधीत संस्थेचे प्राचार्य यांना जबाबदार ठरविण्यात येईल. असे मा. सचिवांनी नमूद केले.

८. ब-याच शासकीय संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्या कारणाने कांही अभ्यासक्रम बंद करावे लागतील असे विभागीय सहसंचालकांनी नमूद केले. त्यास अनुसरुन मा. संचालकांनी विद्यार्थ्यांची संख्या का कमी होते याचा प्राचार्यांनी तसेच सहसंचालकांनी देखील योग्य तो आढावा घेणे गरजेचे असल्याचे नमूद केले. त्याचप्रमाणे जे अभ्यासक्रम बंद करावयाचे आहेत त्यामध्ये कांही सुधारणा करत येणे शक्य आहे का तसेच येणा-या अडचणींवर मात करता येणे शक्य आहे का याचा विचार करावा व त्यादृष्टीने योग्य तो मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करावेत असे निर्देशित केले. तसेच जे अभ्यासक्रम बंद करावयाचे आहेत त्याबाबतच्या योग्य त्या कारणमिमांसेसहीतचा प्रसताव संचालनालयास सादर करावा असे सूचित करण्यात आले. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम बंद करणे किंवा विद्यार्थ्यांचे प्रवेश कमी होणे याकरीता एनबीए ॲक्रीडेशनची कमतरता असल्याची बाब मा. सचिवांनी पुनश्च अधोरेखित केली व एनबीए ॲक्रीडेशनच्या मुद्दयावर सर्वच सहसंचालकांनी गांभीर्याने विचार करणे व कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे पुनश्च सूचित केले.

९. संचालक , तंत्रशिक्षण यांनी गेल्या ०३ वर्षातील शासकीय तंत्रनिकेतनातील विविध अभ्यासक्रमांसाठी ३० % पेक्षा कमी प्रवेश झालेल्या अभ्यासक्रमांची माहिती मा. सचिव यांचे निर्दशनास आणली . याबाबत चर्चेअंती अशा अभ्यासक्रमाबाबत विभागीय सहसंचालकांनी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांशी चर्चा करुन असे अभ्यासक्रम बंद करणे किंवा त्यांच्या प्रवेश क्षमतेत घट करणे याबाबतचा सविस्तर प्रस्ताव नव्याने संचालनालयास तातडीने सादर करावा अशी सुचना करण्यात आली. तसेच आवश्यकतेनुसार नाविन्यपुर्ण अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा व आवश्यकतेनुसार अभ्यासक्रमात वाढ करावयाची असल्यास तसा प्रस्ताव सुध्दा सादर करावा अशी सुचना मा. सचिव यांचेकडून करण्यात आली.

१०. सर्व सहसंचालकांनी आढावा बैठकीच्या कार्यसुचीस अनुसरुन संबंधित विभागीय कार्यालयनिहाय व मुद्देनिहाय सादरीकरण केले. विभागीय कार्यालय, पुणे , नाशिक व औरंगाबाद यांचे सादरीकरण हे दर्जेदार नसल्याची बाब मा. सचिव यांनी नमूद करुन त्याबावत तीव्र नाराजी व्यक्त केली तसेच यापुढे अभ्यासपुर्वक व मुद्देसुदपणे

सादरीकरण करण्याबाबत सर्व सहसंचालकांना सूचित केले . त्याचप्रमाणे संस्थांमधील आय वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याबाबतसुध्दा सहसंचालकांनी प्रयत्नशील राहणेबाबत तसेच या बैठकीत उन्नत महाराष्ट्र अभियान या विषयाबाबतचा समावेश विषय सुचीमध्ये घेण्याचे सुचित केले.

११. डीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्ती योजनेबाबत सुरु असलेल्या व करण्यात आलेल्या सहसंचालक स्तराव कार्यवाहीबाबत मा. सचिवांनी समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे अशाच पध्दतीने सदर बाबतची कार्यवाही क राहण्याबाबत सूचित केले.

१२. फ्लिप्ड टिपीओ या संकल्पनेबाबत श्री. गौरव (Consultant E.Y.Global Ltd.) यांनी सादरीकरण केले. याबाब विद्यार्थी , संस्था व औद्योगिक आस्थापना यांच्या गरजा तसेच संभावित सुधारणा विचारात घेऊन याबाबतच डिपीआर संचालनालयातील श्री.साखरे यांचे सहकार्याने संचालनालयास सादर करणेबाबत संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, यांना मा. सचिव यांचेकडून सांगण्यात आले.

१३. श्री . दवणे सहा. संचालक (तां) , तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व श्री. निकम , प्राध्यापक, व्ही.जे.टी.आय., मुंबई यांनी न्यायालयीन प्रकारणाचे व्यवस्थापन करण्याबाबतच्या संगणकीय प्रणाली बाबतचे सादरीकरण केले. ज्यामध्ये विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्थामध्ये असलेल्या न्यायालयीन प्रकरणांच्या सद्यस्थितीची माहिती भरावयाची आहे. याबाबत मा. सचिवांनी सदर प्रणाली बाबत काही अडचण असल्यास किंवा काही प्रश्न विचारावयाचे असल्यास या दोन अधिकाऱ्यांशी संपर्क साधून याबाबतची यथोचित माहिती घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी असे सूचित केले. या संगणकीय प्रणालीस पुर्णत: कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने व्ही.जे.टी.आय., मुंबई यांनी सविस्तर प्रस्ताव त्वरित सादर करुन त्या बाबतच्या मान्यतेसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाने शासनाकडे प्रस्ताव सादर करावा असे सुचित करण्यात आले आहे.

१४. National Scholarship Portal २०१९-२० बाबतची माहिती सर्व विभागीय सहसंचालकांनी सादर केली . त्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांनी अद्याप पर्यंत ज्या संस्थांनी या पोर्टलवर रजिस्ट्रेशन केले नाही त्यांनी तातडीने ते करुन घेण्याबाबतची कार्यवाही करण्याचे सुचित केले.

१५. सर्व विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थांना वरचेवर भेट देऊन संस्थेचे कामकाज कशा पध्दतीने सुरु आहे, संस्थेमध्ये काही अडचणी आहेत का याचा अढावा घेणे गरजेचे असल्याचे मा. सचिव व मा. संचालक यांनी सूचित केले. तसेच ज्या संस्थांची गुणवत्ता वाढ होणे गरजेचे आहे त्या संस्थांवर लक्ष केंद्रित करुन सदर संस्था मुख्य प्रवाहात कशा येतील या दृष्टिने प्रयत्न करावेत. संबंधित संस्थेतील प्राचार्य, विभागप्रमुख यांच्याशी निरंतर संवाद ठेवून योग्य ते मार्गदर्शन करुन संस्थेचा विकास होण्याच्या दृष्टिने प्रयत्नशिल राहावे असे सूचित करण्यात आले. त्याचप्रमाणे AICTE ची Innovation Policy व AICTE Quality

Mandate ही documents सर्व संबंधितांनी अभ्यासून त्याअनुषंगाने गुणवत्तावाढीसाठी प्रयत्नशिल राहण्याचेही सूचित केले.

१६. पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिताच्या गुणवत्ता यादया तपासण्याचे काम विभागीय कार्यालया मार्फत सुरु असून याबाबतचे प्रवेश नियत्रंण प्राधिकरण यांनी विकसित केलेले सफलता पोर्टल हे तंत्रशिक्षण संचालनालयास अद्यापही उपलब्ध नाही. अधिनियमातील तरतुदीनुसार सदर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया संचालकांकडून प्राधिकरणात प्रवेश प्रक्रीया संपल्यानंतर २ महिन्यांत सादर करण्याबाबत तरतूद आहे. परंतु सदर बाबतीत प्राधिकरणाचे बैठकीत नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सफलता पोर्टल वर विद्यार्थ्यांची प्रवेशाची यादी अपलोड करता येत नसल्याने सदर यादी प्राधिकरणाकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करता येत नसल्याची बाब सर्व सहसंचालकांकडून मा. सचिव यांचे निर्दशनांस आणण्यात आली. सदर बाबतीत ARA कडे पत्राव्दारे सुचना देणेबाबत मा. सचिव यांचेकडून उपसचिव यांना सांगण्यात आले. सदर कार्यवाही ही कालमर्यादीत स्वरुपाची असून संगणकीय प्रणाली उशिरा उपलब्ध झाल्यास ऐन वेळेस सर्व माहिती संगणकीय प्रणालीत समाविष्ट करणे जिकरीचे होईल ही बाब मा. सचिवांना अवगत करण्यात आली.

१७. सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने शासकीय संस्थेतील शिक्षक व अनुदानीत संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चिती संदर्भात संचालनालयाकडून दिलेल्या सुचनानुसार तंतोतंत कार्यवाही करावी असे सर्व सहसंचालकांना सूचित करण्यात आले.

१८. ॲडमिशनबाबत School Connect Concept तात्काळ संस्थांनी सुरु करणेबाबत सर्व सहसंचालकांना मा. सचिव व संचालक यांचेकडून सांगण्यात आले.

उपरोक्त नुसार मा. सचिव व मा. संचालक यांनी विविध विषयांचा आढावा व त्याबाबत मार्गदर्शन केल्यानंतर विभागीय सहसंचालकांची पुढील बैठक ही मा. सचिव यांच्या दालनात होणार असल्याचे मा. सचिवांनी स्पष्ट केले व त्या बैठकीस हजर राहताना मा. सचिवांनी दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना नुसार, एनबीए बाबत, अभ्यासक्रम बंद करणे, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे इत्यादी बाबत ठोस कार्यवाही करुन विभागीय कार्यालयाचे परिपूर्ण सादरीकरण होईल असे सहसंचालकांनी प्रयत्न करावेत असे सूचित करण्यात आले.

****************************************

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२

E-mail :- desk1@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


## दि. १३/१२/२०१८ रोजी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थांच्या प्राचार्यांच्या आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांच्या प्राचार्यांची आढावा बैठक श्री. सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३/१२/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. सिडनेहॅम इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई येथे आयोजित केली होती.

सदर बैठकीस सोबतच्या यादीत नमुद अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये प्रथम संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी मा. सचिव यांच्या अनुमतीने तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व विभागीय कार्यालयाचे सहसंचालक व शासकीय संस्थांचे प्राचार्य यांच्याशी संवाद साधत शासकीय संस्थांचे प्राचार्य यांच्याकडून तंत्रशिक्षण संचालनालयास अपेक्षित असलेल्या कामकाजाबाबत पुढीलप्रमाणे सूचना दिल्या :-

१. सर्वच शासकीय संस्थांकडे जवळपास १५ एकर जागा उपलब्ध आहे. प्रत्येक संस्थेमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, कर्मशाळा, यंत्रसामुग्री व शिक्षकीय पदांची उपलब्धता असताना देखील शासकीय तंत्रनिकेतनांमधून १०० टक्के प्रवेश झालेले नाहीत. काही शासकीय तंत्रानिकेतनांमधे कांही अभ्यासक्रमात जवळपास ५० ते ५८ टक्के जागा रिक्त आहेत ही निश्चितच गंभीर बाब असून सर्वच प्राचार्यांनी याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे सूचित केले. सन २०१९-२० पासून पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया ही तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्तरावर राबविली जाणार असल्याने यावर्षी शासकीय तंत्रनिकेतनातील एकही जागा रिक्त राहणार नाही याकरीता सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत आणि सदर प्रवेश प्रक्रीया यशस्वीपणे पार पाडली पाहिजे असे आग्रही प्रतिपादन संचालकांनी केले. त्याचप्रमाणे मा.सचिवांच्या मनोदयानुसार यावर्षी शासकीय तंत्रनिकेतनांच्या पदविका अभ्यासक्रमाच्या १०० टक्के जागा भरल्या जातील याबाबत सर्वांनी मिळून प्रयत्न करणेबाबत सूचित केले.

२. पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया यशस्वी करण्याकरीता आतापासूनच सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्याकरीता प्राचार्यांनी संस्था स्तरावर विद्यार्थी-पालकांचे मार्गदर्शनपर मेळावे आयोजित करणे, त्यांना पदविका अभ्यासक्रमाबाबतची सविस्तर माहिती देणे, पदविका अभ्यासक्रम विद्यार्थ्यांकरीता कसे हितकारक आहेत याबाबत जनजागृती करणे ही जबाबदारी प्राचार्यांनी घेणे आवश्यक आहे. विद्यार्थी व पालकांचे मेळाव्याबाबत Career fair घेण्यासाठी MSBTE चे अंदाजपत्रकामध्ये भरघोस तरतूद केलेली असल्याचे व त्यांचा लाभ सर्व शासकीय संस्थांनी घेण्याचे सूचित केले.

३. यापुढे मा.सचिव व संचालक कोणत्याही तंत्रनिकेतनास आकस्मिक भेट देऊन तेथील कामाचा आढावा घेणार आहेत. नुकतीच मा.सचिवांनी शासकीय तंत्रनिकेतन, धुळे संस्थेस भेट दिली होती , मात्र तेथील एकूणच व्यवस्था आणि संस्थेची अवस्था पाहून त्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात आले. कांही संस्थांमध्ये Teaching-Learning Process अजूनही व्यवस्थित होत नाही, हे चित्र यापुढे दिसता काम नये. स्वेच्छानिधीचा वापर प्राचार्यांचे स्तरावर व्यवस्थित केला जात नाही ज्यामुळे संस्थेमधे आवश्यक असलेली छोटी-मोठी कामे तशीच अडून राहतात. सर्व प्राचार्यांनी स्वेच्छा निधीचा योग्य तो वापर करुन संस्थेतील कामे करणे आवश्यक आहे. आतापर्यंत स्वेच्छा निधीच्या खर्चाबाबतचे फार थोडे प्रस्ताव संचालनालयास प्राप्त झालेले आहेत ही निश्चितच खेदजनक बाब असल्याचे उपस्थित प्राचार्यांचे निदर्शनास आणून याबाबत गांभीर्यपूर्वक नोंद घेण्याचे सूचित केले.

४. स्वीय प्रपंजी लेख्याबाबतच्या नवीन शासन निर्णयानुसार संचालक, सहसंचालक तसेच प्राचार्य यांना खर्चाच्या मर्यादेमध्ये अधिकार दिलेले आहेत. मात्र त्यानुसार संचालनालयाकडे व्यवस्थित प्रस्ताव येत नाहीत, अंदाजपत्रक व्यवस्थित पाठवले जात नाही. सद्यस्थितीत तंत्रनिकेतनांना योग्य प्रमाणात निधी दिला जातो, संस्थेतील शिक्षकीय पदे ब-यापैकी भरलेली आहेत, बहुतांश संस्थांमध्ये नियमित प्राचार्यांची पदे भरलेली आहेत त्यामुळे आता संस्थांनी विद्यार्थी हिताच्या दृष्टीने तसेच संस्थेच्या हिताच्या, विकासाच्या दृष्टीने पावले उचलून जनमानसात तंत्रनिकेतनांची प्रतिमा उंचावेल या अनुषंगीक कामे प्राचार्यांकडून होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

५. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शासकीय संस्थांच्या कामाशी संबंधीत वेगवेगळया प्रकारच्या २८ योजना आहेत. या सर्व योजना राबविण्याकरीता परिषदेकडून निधीदेखील दिला जातो. या सर्व योजना जरी राबविणे शक्य नसेल तरी त्यातील कांही निवडक योजना विभागातील संबंधीत शासकीय/अनुदानीत संस्थांमध्ये राबविण्यास हरकत नाही. अशा योजनांचा लाभ घेण्यासाठी संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. विविध योजनांसाठी जसे Student Development Scheme, Faculty Development, Institute Development, QIP, Modrob, Skill Development करीता असलेल्या AICTE च्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याच्या दृष्टीने संस्थेच्या प्राचार्यांनी प्रयत्न करावेत.

६. ब-याच शासकीय संस्थांमध्ये Public Grievance System सुरु नाही. संस्थेचे संकेतस्थळ अद्ययावत नाही. Public Grievance System प्रत्येक संस्थेमध्ये सुरु असणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत मा.न्यायालयाने देखील नाराजी व्यक्त केलेली आहे आणि ही अतिशय गंभीर बाब असल्याचे उपस्थित प्राचार्यांचे निदर्शनास आणून दिले.

७. परदेशी शिष्यवृत्ती योजनेबाबत सर्वच संस्था स्तरावर उदासीनता दिसून येते. याबाबत विभागीय सहसंचालकांकडून मार्गदर्शक सूचना तसेच जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच प्राचार्यांनी देखील याबाबत स्वत: लक्ष घालून सदर योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल याद्दष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

८. सर्व तंत्रनिकेतनांनी संस्थेकरीता लागणा-या Infrastructure खरेदीकरीता शासनाच्या GEM वर register होऊन सदर खरेदी करणे आवश्यक आहे. मात्र अद्याप एकाही तंत्रनिकेतनाकडून याबाबतचा प्रस्ताव संचालनालयास प्राप्त झालेला नाही. तरी सर्व संस्थांनी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन यापुढे संस्थेबाबतची खरेदी प्रक्रीया ही GEM वरूनच पार पाडली जाईल असे पहावे.

९. संचालनालयाच्या अधिपत्याखाली एकूण ४४ शासकीय तंत्रनिकेतने व ९ अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. मात्र त्यापैकी जेमतेम ४ ते ५ संस्थांचे ॲक्रीडीटेशन झालेले आहे ही बाब खूपच गंभीर आहे. सद्यस्थितीत तंत्रनिकेतनांची बहुतांश शिक्षकीय पदे भरलेली असल्यामुळे NBA च्या मानांकनानुसार प्रक्रीया करणे सुलभ झालेले आहे. गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत सर्व संस्थांचे ॲक्रीडीटेशन झालेच पाहिजे. येत्या सहा महिन्यात सर्व संस्थांनी त्यांच्या संस्थेतील कोणकोणत्या विद्याशाखांचे ॲक्रीडीटेशन होऊ शकते याबाबतचा प्राचार्यांनी आढावा घेऊन अशा शाखा ॲक्रीडेट होतील यासाठी प्रयत्न करावेत.

१०. वर नमूद केलेल्या बाबींबाबत सर्वच प्राचार्यांनी गांभीर्याने कामाचे नियोजन करुन त्यानुसार कार्यवाही करणे गरजेचे असून प्रत्येक वर्षीचा कार्यमूल्यमापन अहवाल हा प्राचार्यांनी वरीलप्रमाणे सर्व बाबींवर केलेल्या कामाचा विचार करुनच लिहिला जाणार आहे याची सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी. तसेच वेळोवेळी सदर कामाबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

११. तसेच पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश आणि संस्थांचे ॲक्रीडीटेशन याबाबत मा.सचिव यांच्या मनोदयानुसार आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील असे सर्व प्राचार्यांचे वतीने संचालकांनी मा.सचिवांना आश्वस्त केले.

उपरोक्तप्रमाणे संचालकांनी सर्व प्राचार्यांशी संवाद साधून मार्गदर्शक सूचना दिल्या. त्यानंतर मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी सर्व प्राचार्यांशी संवाद साधतांना त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या कामकाजाबाबत खालीलप्रमाणे निर्देश दिले :-

१. शिक्षण क्षेत्रात Access equity व Quality यांचे महत्व विषद करुन भविष्यात येणा-या औद्योगिक विश्वातील विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपल्या संस्थांची तयारी असणे गरजेचे आहे. त्यामुळे या आव्हानांना

सामोरे जाण्यासाठी प्रत्येकानेच प्रयत्नशील राहून काम करणे आवश्यक आहे. शासकीय तंत्रनिकेतनातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणा-या विद्यार्थ्यांस नोकरी शोधताना महत्प्रयास करावे लागतात हे आजचे चित्र आहे. मात्र येणा-या १० वर्षातील औद्योगिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपण आपल्या विद्यार्थ्यांना त्यादृष्टीने तयार करणे, त्याकरीता संस्था स्तरावर प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

२. संस्थेची गुणवत्ता सुधारणे, त्यामध्ये वाढ करणे हे प्रत्येक प्राचार्यांचे उद्दिष्ट असले पाहिजे. आणि गुणवत्ता सुधार करण्याकरीता संस्थांनी ॲक्रीडीटेशन करुन घेणेही तितकेच महत्वाचे व गरजेचे आहे.

३. संस्थेमध्ये Teaching-Learning Process योग्य असणे आवश्यक आहे. निव्वळ विद्यार्थ्यांनी परीक्षा देणे आणि उत्तीर्ण होणे यालाच महत्व न देता विद्यार्थ्यांची संस्थेतील उपस्थिती, शिस्तबध्दता यांनादेखील तितकेच महत्व आहे. त्यामुळे प्रत्येक प्राचार्यांनी यादृष्टीने संस्थेकडे पाहणे आणि गुणवत्ता सुधारणे आवश्यक आहे.

४. शैक्षणिक स्वायत्तता हा देखील एक महत्वाचा घटक आहे. प्रत्येक संस्थेने शैक्षणिक स्वायत्ततेसाठी आग्रही असणे गरजेचे आहे. मात्र संस्था स्तरावर याबाबतची उदासीनता दिसून येते. संस्थांचा औद्यागिक विश्वाशी संवाद असणे गरजेचे आहे. शासकीय संस्थांमधून, महाविद्यालयांमधून नवीन नवीन कल्पनांचा उदय होणे आवश्यक आहे. नवनवीन संकल्पना राबविणे गरजेचे आहे, ज्यायोगे संस्थेचा विकास होऊ शकतो, गुणवत्ता सुधार होऊ शकते. त्याकरीता विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, अभ्यासाबरोबरच त्यांच्यामध्ये असलेल्या विविध गुणांना वाव मिळेल यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

५. स्वायत्त संस्थांनी त्यांच्या Strength बघून तेथे Centre of excellence कोणत्या शाखेचे होऊ शकते यांचा अभ्यास प्राचार्य व संबंधीत सहसंचालक यांनी करून तसे प्रस्ताव संचालनालयास पाठवावेत व यानुसार भविष्यात शासकीय संस्थेमध्ये दर्जेदार Centre of Excellence निर्माण होऊ शकतील.

६. सन २०१९-२० पासून पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्तरावर राबविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर प्रवेश प्रक्रिया राबवितांना यावर्षी तंत्रनिकेतनाच्या सर्वच्या सर्व जागा भरल्या जातील यादृष्टीने सर्व प्राचार्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

७. परदेशी शिष्यवृत्ती योजना ही शासनाकडून नव्याने सुरु केलेली असून सदर योजनेची माहिती सर्व विद्यार्थ्यांपर्यत प्रामुख्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यत पोहोचणे गरजेचे असून त्यासाठी प्राचार्यांनी सर्वकष प्रयत्न करणे गरजेचे आहे. जे हुशार विद्यार्थी आर्थिक पाठबळाअभावी मागे राहतात अशा विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळू शकेल या दृष्टीने प्रयत्न होणेही आवश्यक आहे. पुणे, नाशिक, मुंबई या विभागांनी देखील परदेशी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळण्याच्या दृष्टीने ठोस प्रयत्न करावेत.

८. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत जे अभ्यासक्रम चालविले जातात त्या अभ्यासक्रमाच्या अभ्यासकेंद्रासाठी शासकीय तंत्रनिकेतनांनी विद्यापीठाला केंद्र उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीकोनातून आढावा घ्यावा.

९. सर्व शासकीय तंत्रनिकेतनांकडे मोठी जागा असल्यामुळे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करणे फार कठीण नाही, त्यामुळे सर्व संस्थांनी जर माजी विद्यार्थी मेळावे आयोजित करुन वृक्ष लागवडीसाठीची मोहिम हाती घेतल्यास सर्वच संस्थांमध्ये हरीतक्रांती होऊ शकेल व शासनाच्या वृक्ष लागवड धोरणास योग्य ती चालना मिळू शकेल. संस्थांनी माजी विद्यार्थी मेळाव्यांचे आयोजन करावे ज्यामुळे विविध माध्यमातून त्यांची संस्थेला मदत होऊ शकते.

त्यानंतर पूर्वसूचनेनुसार कांही संस्थांचे प्राचार्यांनी एक एक करुन त्यांच्या संस्थेशी निगडीत विविध मुद्दयांबाबतचे Presentation मा.सचिवांसमोर सादर केले. तसेच संस्थांचे Presentation संचालनालयाकडे soft copy मध्ये सादर करण्याचे निर्देश प्राचार्यांना देण्यात आले. Presentation ची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मा.संचालकांनी मा.सचिव आणि उपस्थित प्राचार्यांचे आणि मंत्रालयातील उपस्थित अधिकारी वर्गाचे आभार मानून आढावा बैठक संपल्याचे जाहीर केले.

********************